
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५६ वे, अंक ६वा, मुंबई । ऑगस्ट २०२३
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०


Year : 56, Issue : 6, Mumbai I August 2023
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## ७७व्या भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा



## स्वातंत्र्य दिन चिरायू होवो

# विद्यार्थी गुणगौरव सोहळा

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५६वे, अंक ६वा,
ऑगस्ट २०२३
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in








अकोला




कऱ्हाड


IndusInd Bank
FE INDIA'S BEST BANKS AWARDS
IndusInd Bank has been adjudged the winner in the category of 'Best Savings Product' at the FE Best Banks Awards 2020-21.
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive Interest Rates on Savings Account and Fixed Deposits
VIDEO Branch
Face-to-face banking anytime, anywhere
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
GET UP TO 20% OFF*
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE*
movie ticket on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank
*T&C Apply. Opening of account with IndusInd Bank is subject to ensuring Know Your Customer documentation and verification.
Kindly read terms and conditions of individual offers furnished at www.indusind.com or visit nearest branch of IndusInd Bank to know further details.



HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+ YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

# मनोगत

सभासद बंधू-भगिनींनो,

अधिक श्रावण मासाच्या तसेच गणेश चतुर्थीच्या आपल्या सर्वांना शुभेच्छा.

आपल्या अनेक संस्था सध्या अधिक उर्फ पुरुषोत्तम मास श्रावण मासानिमित्त भागवत सप्ताह, हनुमान उपासना, पुरुषोत्तम याग यज्ञ असे अनेक धार्मिक समारंभ साजरा करत आहेत. या सर्वाचा लाभ त्या त्या संस्थांना व त्यांच्या सभासदांना मिळो व त्यांचा उत्कर्ष होवो.

या शैक्षणिक वर्षापासून आपल्या संस्थेने उच्च शिक्षणार्थ देशात व परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी कर्जाऊ शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. या कर्जरुपी सहाय्य योजनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे.

१) कर्जाची कमाल मर्यादा रु. २ लाख,

२) कर्जाची मुदत ६ महिने वा कमाल ३६ महिने (अभ्यासक्रमाच्या मुदतीवर हे अवलंबीत असेल).

३) कर्जाची परतफेड कर्जदात्यानी त्यांना नोकरी वा व्यवसायातून अर्थप्राप्ती झाल्यानंतर ३ महिन्यात सुरु करून ती २४ महिन्यात पूर्ण करायची आहे.

४) अर्ज मंजूर झाल्यानंतर कर्जदात्यास २ जामीनदार देणे (ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ५ लाख आहे) अनिर्वाय आहे.

५) कर्ज मंजूर झाल्यावर कर्जदात्याने वा त्याच्या पालकांनी पाच कोरे धनादेश देणे अनिवार्य आहे

६) ज्या विद्यापीठात प्रवेश मिळाला असेल त्या विद्यापीठाचे प्रवेश पत्र देणे अनिर्वाय आहे.

७) ज्या विद्यापीठात प्रेवश घ्यायाच असेल त्या विद्यापीठासंबंधी तसेच कर्जदाता घेऊ इच्छिणाऱ्या अभ्यासक्रमाविषयी व त्याद्वारे त्यांना उपलब्ध होणाऱ्या नोकरी वा उद्योगधंद्यासंबंधी माहिती देणे आवश्यक आहे.

८) अर्जदाता देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेचा सभासद असणे आवश्यक असून ते सभासद असलेल्या स्थानिक संलग्न संस्थेची शिफारस अनिवार्य आहे.

या वर्षी आम्ही फक्त ५ विद्यार्थ्यांना कमाल रु. १० लाख पर्यंत (म्हणजेच प्रत्येक विद्यार्थ्यांना कमाल दोन लाख) अशी मदत करणार आहोत. जी संस्थेच्या उपलब्ध निधीनुसार पुरवण्यात येईल.

शेवटी व महत्त्वाचे की, अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचा सर्वस्वी अधिकार अखिल देशस्थ ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाला राहील व त्याचे संबंधी कुठलीही तक्रार करण्याचा अधिकार अर्जदाराला किंवा संलग्न संस्थांना नसेल.

आपल्या संस्थेने आतापर्यंत अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनींना त्यांच्या उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक मदत देऊन त्यांना त्यांच्या क्षेत्रात नाव कमावण्याचे व आर्थिक प्रगती करण्यासाठी निस्वार्धपणे मदत केली आहे. व त्यातून आपले अनेक समाजबांधव भारतात व परदेशात विशेषतः सिलिकॉन व्हॅलीमध्ये व युरोपात व आखाती देशात यशस्वीपणे उद्योग करत आहेत वा नोकरी करत आहेत. त्यांना झालेल्या या मदतीची अनेकांनी जाण ठेऊन त्यांचे सामाजिक दायित्व म्हणून संस्थेला देणगी स्वरुपात मदत केली आहे. परंतु आजकालच्या जमान्यात उच्च शिक्षण हे अधिकाधिक महाग होत चालले आहे व ज्या कोर्सकरता पूर्वी दोन लाख रुपये लागत होते त्याची फी आता १० ते १२ लाख आहे. याचा विचार करता आपण सगळ्यांच्या लक्षात येईल की आमच्याकडून होणारी २ लाखाची मदत ही अतिशय तुटपुंजी आहे व ती पाच विद्यार्थ्यांपुरता मर्यादीत आहे.

याचा विचार करून ज्या बंधूभगिनींनी आपल्या या उपक्रमाचा पूर्वी लाभ घेतला आहे. तसेच समाजातील जे दानशूर उद्योगपती वा नोकरदार उच्च पदावर आहेत त्यांनी आमच्या या वरील योजनेस आर्थिक हातभार लावावा ही आग्रहाची विनंती जेणेकरून आमल्या समाजातील अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनी उच्च शिक्षण देशात व परदेशात घेऊन आपल्या समाजाचा, राष्ट्राचा अभिमान उंचावतील व कोणीही योग्य विद्यार्थी-विद्यार्थीनी आर्थिक संकटामुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहणार नाही. अर्ज मंजूर अथवा नामंजूर करण्याचा संस्थेचा निर्णय अंतिम असेल याची कृपया नोंद घ्यावी.

आपल्या सगळ्यांना कळवण्यात आनंद वाटतो की, आर्थिक वर्ष २०२२-२३ पासून आपल्या संस्थेला प्राप्त होणाऱ्या देणग्यांना आयकराच्या ८०जी कलमाअंतर्गत सूट देण्यात आली आहे. याचा विचार करून आपण आम्हाला भरघोस मदत कराल अशी अपेक्षा बाळगतो. कळावे, धन्यवाद.

**प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

## भारताच्या प्रगतीचा आढावा

आपले पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांच्या गेल्या ९ वर्षातील म्हणजेच २०१४ ते २०२३ या कार्यकाळात देशानी केलेल्या प्रगतीचा तुलनात्मक आढावा.

| | कार्यकाळ २०१४ पर्यंत | कार्यकाळ २०१४ ते २०२३ | वाढ वा तूट |
|---|---|---|---|
| सकल घरेलू उत्पादन (GDP) | USD 1.8 Trillion | USD 3.8 Trillion | २.११ पट |
| जागतिक अर्थव्यवस्थेतील क्रमांक | 10 वा | 5 वा | ५ क्रमांकाने वरती |
| दरडोई उत्पन्न | Rs. 78,000 | Rs. 1,15,000 | १.४८ पट |
| निर्यात | USD 200 Billion | USD 750 Billion | ३.७५ पट |
| मेट्रो शहरे | 5 | 20 | ४ पट |
| ग्रामीण विद्युतीकरण | 40% | 95% | २.३७ पट |
| एक्सप्रेस वे लांबी | 680 KM | 4067 KM | ६ पट |
| राष्ट्रीय महामार्ग लांबी | 25700 KM | 53700 KM | २ पट |
| रेल्वे लांबी | 22048 KM | 55198 KM | २.५ पट |
| रस्त्याची गुणवत्ता | 88 | 42 | २ पट |
| पर्जन्य ऊर्जा | 25.7gW | 95.7gW | ३.७२ पट |
| Unicorn | 1 | 114 | ११४ पट |
| 1 GB Data ची किंमत | Rs. 200 | Rs. 15 | १३ पटीने कमी |
| इंटरनेट जोडणी | 58.9 Minutes | 771.3 Minutes | १३ पटीची वाढ |
| डिजिटल व्यवहार | 4.4% | 76.1% | ७३ पटीची वाढ |
| घ्घ्ऊे ची संख्या | 16 | 23 | ७ ने वाढ |
| घ्घ्श्े ची संख्या | 13 | 20 | ७ ने वाढ |
| खादी विक्री | 2.14 लाख कोटी | 6.69 लाख कोटी | ३ पट वाढ |
| मेट्रो रेल्वेची लांबी | 248 Kms | 860 Kms | ३.५ पटीची वाढ |

| | | | |
|---|---|---|---|
| परकीय गंगाजळी | USD 303 Billion | USD 594 Billion | १.९८ पट वाढ |
| रेल्वे विद्युतीकरण | 5 K RKMs | 37 K RKMs | ७.४ पटीने वाढ |
| वैद्यकीय शिक्षण आसन क्षमता | 51348 | 100163 | २ पट वाढ |
| पदव्युत्तर शिक्षण आसन क्षमता | 31185 | 65335 | २ पट वाढ |
| ऑल इंडिया मेडिकल सायन्स हॉस्पिटल | 7 | 22 | १५ ने वाढ |
| वैद्यकीय महाविद्यालये | 387 | 660 | २७३ ने वाढ |
| विमानतळे | 74 | 148 | ७४ ने वाढ |
| थेट विदेशी आवक | USD 299 Billion | USD 596 Billion | २ पट वाढ |
| बँक खाती | 35% | 98% | २.८ पट वाढ |
| अति वेगवान रेल्वे | 0 | 1-UC, 8-A | लक्षणीय वाढ |
| नवीन रेल्वेमार्गांची उभारणी | 20 महिने | 2 महिने | १० पट सुधारणा |
| स्वच्छता | 39% | 85% | २ पट वाढ |
| ग्रामीण रस्ते | 69 किमी दर दिवशी | 130 किमी दर दिवशी | १.९० पट वाढ |
| विद्यापीठे | 730 | 1100 | ३७० ने वाढ |
| मोबाईल मार्केटींग | 5.8 कोटी | 31 कोटी | ५ पट वाढ |
| गॅस जोडणी | 55% | 90% | १.६३ पटीने वाढ |
| CSC | 84000 | 300000 | ३.५७ पटीने वाढ |
| ऑप्टीकल फायबर | 0.02% | 50% | १०० पटीने वाढ |
| आयकर विवरण पत्रे | रु. 3.8 कोटी | रु. 7 कोटी | २ पट वाढ |
| व्यवसाय सुलभता क्रमांक | 142 | 70 | ७२ क्रमांकानी वर |
| नविनता निर्देशांक | 76 | 57 | १९ क्रमांकाची सुधारणा |
| e-Govt निर्देशांक | 118 | 96 | २२ क्रमांकाची सुधारणा |
| पर्यटन निर्देशांक | 65 | 40 | २५ क्रमांकाची सुधारणा |
| वातावरण बदल निर्देशांक | 30 | 14 | १६ क्रमांकाची सुधारणा |
| e-participation निर्देशांक | 40 | 15 | २५ क्रमांकाची सुधारणा |
| संरक्षण उत्पादने निर्यात | रु. 1000 कोटी | रु. 16000 कोटी | १६ पट वाढ |
| सिमेवरील पायाभूत सुविधा | ह्न- | - | उत्कृष्ट |
| राफेल विमाने | शून्य | 36 | ३६ पट वाढ |
| आपाची विमाने | शून्य | 22 | २२ पट वाढ |
| चिनॉक्स् विमाने | शून्य | 15 | १५ पट वाढ |
| एस-४०० विमाने | शून्य | 5 पथक | ५ पट वाढ |

वस्तू व सेवा कर याची अंमलबजावणी आपल्या देशामध्ये २०१५ पासून सुरु झाली व जून २०२३ च्या महिन्यामध्ये वस्तू व सेवा करातून देशाला रु. १.६५ हजार कोटी ची प्राप्ती झाली असून गेली दोन वर्षे दरमहा वस्तू व सेवाकराच्या प्राप्तीमध्ये साधारणतः ८ ते १० टक्के वृद्धी होत असते.

भारताच्या औद्योगिकरणाचा व आर्थिक धोरणाचा दृश्य परिणाम म्हणजे नुकत्याच झालेल्या आर्थिक सर्वेक्षणानुसार ३२ ते ३४ टक्के नागरिकांनी दारिद्र्य रेषेच्या वर आले असून त्यांचा आर्थिक स्तर उंचावला आहे.

वरील माहितीवरुन आपल्या सगळ्यांच्या लक्षात येईल की आपल्या भारताने औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रात मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ९ वर्षात भक्कम कामगिरी केली असून आपला देश एक जगातील विकसित अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. २०२७-२८ पर्यंत या वेगाने देशाची प्रगती झाल्यास निश्चितच भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था म्हणून संबोधला जाईल.

विशेषतः भारताने माहिती आणि तंत्रज्ञान तसेच पायाभूत सुविधा क्षेत्रात, दळणवळण क्षेत्रात व विशेष करून संरक्षण उत्पादन क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली आहे. जो आपला देश १९४८-४९ साली संरक्षण क्षेत्रात पूर्णपणे परावलंबी होता तो आता हळूहळू स्वावलंबी होण्याचा मार्गावर आहे. याचा परिणाम म्हणजे एशिया पॅसिफिक या विभागामध्ये भारत एक प्रचंड शक्ती म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.

मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भरता या दोन योजनाखाली भारताची आयात कमी होत असून त्याचा दृश्य परिणाम आपल्या परकीय गंगाजळीवर झाला आहे. भारतीय रुपया आंतरराष्ट्रीय क्षेत्रावर लवकरच चालू खात्यावर परिवर्तीत झाल्यास त्याचा मोठा फायदा भारतातील आयात व निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना होणार आहे कारण त्यामुळे रुपयाचे मूल्य स्थिर राहील व भारतीय मालाला जगामध्ये किंमतीच्या दृष्टीने स्पर्धा कमी होईल. तसेच भारतात लवकरच टेस्ला ऑणि फॉसकॉन या कंपन्यांनी प्रवेश घेतला आहे. त्यामुळे भारतात लवकरच सेमी कंडक्टर आणि चिप्स् यांची निर्मिती भव्य प्रमाणात सुरु होणार आहे. तसेच विद्युत वाहने उत्पादन करण्याचे भारत पुढील काही वर्षात एक हब ठरु शकते. विशेषतः वाहन उद्योगामध्ये म्हणजेच मोटारी उत्पादनामध्ये भारत पुढच्या दोन वर्षात तिसऱ्या क्रमांकाचा देश म्हणून गणला जाईल. या सर्वांचा परिणाम म्हणजे भारतात नवीन उद्योजक निर्माण होतील व रोजगाराच्या प्रचंड संधी देशातील बेरोजगारांना उपलब्ध असतील. यामुळे भारताचे सकल घरेलू उत्पादन व राष्ट्रीय उत्पादन समाधानकारकरित्या वाढणार असून भारताला जागतिक स्तरावर एक वेगळेच स्वतःचे स्थान निर्माण करण्यास मदत होईल व आपला भारत देश भविष्यात एक महासत्ता म्हणून ओळखला जावा ही आपल्या सगळ्यांची इच्छा साकार होवो ही प्रार्थना.

देशाची आर्थिक परिस्थिती जगाच्या मंदीच्या काळामध्ये सुद्धा सुदृढ राहिली याचे श्रेय आपल्या रिझर्व्ह बँकेने अवलंबिलेल्या आर्थिक पतधोरण व इतर निर्बंध याला द्यावे लागेल. सध्याच्या अर्थमंत्र्यांच्या मार्गदर्शनानुसार आतापर्यंत अवलंबलेल्या रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक धोरणामुळे कोरनासारख्या महामारीच्या काळातसुद्धा  व त्या आधी प्रचंड मंदीच्या काळातसुद्धा भक्कमपणे उभी राहिली आहे याचे श्रेय भारताच्या रिझर्व्ह बँकेला सरकारी व खाजगी क्षेत्रातील बँकांना व आपल्या सर्व उद्योजकांना जाते. भारत सरकारने मेकींग इंडिया उपक्रमाअंतर्गत देशातील तरुण उद्योजकांना स्टार्टअप इंडिया अंतर्गत वेगवेगळ्या प्रकारचे तांत्रिक मार्गदर्शन व सुखसोयी तसेच व्यापार सुलभता उपलब्ध करुन दिली आहे त्यामुळे अनेक तरुण उद्योजक पुढे येत असून त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर लक्षणीय कामगिरी केली आहे. त्यामध्ये ब्राह्मण उद्योजकांचाही सहभाग मोठा आहे. विशेषतः तंत्रज्ञान व औषध निर्मिती क्षेत्रात आपल्या नवउद्योजकांनी भरीव कामगिरी केली आहे व आज महाराष्ट्रासारख्या राज्यात फार्मसी हब निर्माण करण्यासाठी सरकारने पावले उचलली आहेत. करोना

काळात रेमिडीसीवर व इतर लस सिरम इन्स्टिट्यूटद्वारे निर्मिती करून भारताने जगाला त्याचा पुरवठा केला आहे. त्यामुळे आज सर्व विश्वात जगातील लोक अतिशय मानाने बघतात. या सर्वाचा आपल्याला अभिमान असावा.

ब्राह्मण समाजातील युवकांना आणि युवतींना नोकरीच्या मागे न पडता त्यांनी उद्योजक व्हावे यासाठी काही ब्राह्मण संस्था पुढाकार घेत आहेत. आमच्या संस्थेचाही त्यामागे योग्य तो सहभाग असेल.

चला तर आपण ब्राह्मण उद्योजक बनूया. ब्राह्मणांना संपन्न व समर्थ करुया व भारत हा देश लवकरात लवकर विश्वातील महाशक्ती म्हणून निर्माण होईल अशी प्रार्थना करुया.

**– श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

## कर्तव्य श्रेष्ठ की रुढी परंपरा?

**स. भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

सध्या श्रावणमास सुरू आहे. अनेकजण विविध व्रत वैकल्य या काळात करत असतात या अधिक महिन्याला विविध नावांनी संबोधले जाते. त्यास मलमास किंवा पुरुषोत्तम मास असेही म्हणतात. काही ठिकाणी याला धोंड्याचा महिना असेही संबोधतात. या वर्षी असा योगायोग आला आहे की, श्रावण महिन्यात अधिक मास आहे. या अधिक मासा संदर्भात अनेक कथा, आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्या पैकी ही एक कथा अशी की नारद पृथ्वीवर फिरत होते. त्या वेळी त्यांना अनेक दुःखी माणसे दिसली. पृथ्वीवरील माणसांचे दुःख दूर कसे करावे, याचा विचार करीत नारद वैकुंठाला आले व श्रीविष्णूंना म्हणाले, देवा! मृत्युलोकातील माणसे दुःखी आहेत. त्यांचे दुःख नाहीसे करणाऱ्या अधिक मासाची कहाणी आपण सांगावी. आपले विचार पृथ्वीवरील लोकांना मी ऐकवीन आणि त्यांची दुःखे कमी होऊ शकतील.

श्रीविष्णू म्हणाले, चंद्र-सूर्याच्या गतीत जो फरक पडतो, त्याचा मेळ बसवण्यासाठी दर तीन वर्षांनी एक महिना अधिक धरावा लागतो. या महिन्यात सूर्यसंक्रांत नसते म्हणून त्याला मलीन महिना किंवा मलमास म्हणतात. या महिन्यात लग्नकार्यादी मंगलकार्ये करीत नाहीत. मी त्या मलीन अधिक महिन्याला पुरुषोत्तमाचे दिव्यरूप प्राप्त करून दिले. गोपालकृष्णाने वर दिला की, या महिन्यात तीर्थस्नान, व्रत, नियम वगैरे धर्माचरणाचे पुण्य कर्मे करतील, त्यांना पुरुषोत्तमाची कृपा प्राप्त होईल. त्यांचे जीवन सार्थक होईल, त्यांचे मनोरथ पूर्ण होतील.

दुसऱ्या प्रचलित वा पारंपारिक कथेनुसार, दक्ष राजाच्या कन्येने आपला प्राण त्याग केला होता आणि हिमालय राजाच्या घरी पार्वती म्हणून तिचा पुनर्जन्म झाला होता. पार्वतीला भगवान शिवाशी लग्न करायचे होते. त्यामुळेच तिने श्रावण महिन्यात तपश्चर्या केली. पार्वतीच्या भक्तीने भगवान शिव प्रसन्न झाले आणि त्यांनी तिची इच्छा पूर्ण केली. अशा भक्तीपूर्ण तपश्चर्येमुळे भगवान शिवाला श्रावण महिना खूप आवडतो.

अनेक व्रत वैकल्ये आपणांस माहित असतील व ती तुम्ही मनोभावे करतही असाल. हे असे अनेक सण-वार, अशा रुढी परंपरा हिंदू धर्मात चालत आलेल्या आहेत. रुढी परंपरेमुळे आपली संस्कृती टिकून राहते. आपली भाषा, आपले आचार, विचार, खाद्य परंपरा आपला पेहराव येणाऱ्या पिढ्यांना समजतो. परंतू काही रुढी परंपरा काळानुरुप बदलल्या पाहिजेत हे मात्र आपण लक्षात घेतले पाहिजे. काळानुरुप बदलण्याची परंपराही आपण कायम ठेवली पाहिजे. पण हे करताना आपल्या कर्तव्यांचा आपल्याला विसर पडता कामा नये.

नवीन सवयी लावून घेण्यासाठी दिलेला अधिक वेळ आहे. एखादी गोष्ट महिनाभर न चुकवता केली, तर ती सवयीची होते, असे पाश्चात्य प्रशिक्षक कळकळीने सांगतात. तीच सोय अधिक मासाच्या व्रताने करून दिली आहे. दर अधिक मासात काही नवीन व्रत धरावे, ते मनोभावे पाळावे आणि मग जन्मभर सवय म्हणून एक एक रत्न जडून घ्यावे. हेच त्या व्रताचे महात्म्य आहे.

खरे पाहता धर्म म्हणजे काय असा जेव्हा प्रश्न समोर येतो तेव्हा माझ्या मते आपली कर्तव्ये पार पाडणे हाच खरा धर्म होय. आपल्या कुटुंबात आपली काही कर्तव्ये असतात, आपल्या व्यवसायात काही कर्तव्ये असतात तसेच समाज व देशाप्रती आपली कर्तव्ये असतात ही सर्व कर्तव्य चोखपणे पार पाडणे म्हणजेच धर्म निभावणे होय. आपल्या उपासना पद्धती वेगवेगळ्या असू शकतात आपल्या परंपरा व संस्कृती वेगवेगळ्या असू शकतात मात्र आपली कर्तव्ये सारखीच असतात. त्यामुळेच रुढी परंपरा निभावताना, व्रत वैकल्ये पार पाडताना आपली कर्तव्येही आपण जबाबदारीने पार पाडली पाहिजेत. आपण दोन्ही गोष्टींचा समतोल ठेवला पाहिजे.

## चांद्रयान ३ च्या यशस्वी प्रक्षेपणात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचा सहभाग

चांद्रयान ३ चे प्रक्षेपण पाहून सर्व भारतीयांचे डोळे आनंदाश्रू आणि ऊर स्वाभिमानाने भरून आला आहे.

या चांद्रयान ३ चे लुनार ऑरबीटमध्ये म्हणजे चंद्राच्या कार्यकक्षेत ०१.०८.२०२३ रोजी प्रवेश करून एक महत्त्वाचा पल्ला गाठला आहे. हे चांद्रयान आता केवळ चंद्रापासून ४४०० किमी अंतरावर आहे व दि. १८.०८.२०२३ रोजी ते यशस्वीपणे चंद्रावर उतरणार आहे. चंद्राच्या भूगर्भाचा व एकंदरीत तेथील वातावरणासंबंधी माहिती हे चंद्रयान श्रीहरीकोटा येथील आंतराळ केंद्राला पाठविण्यास सुरु करेल. भारत अंतराळ क्षेत्रात एक भव्य शक्ती म्हणून पदार्पण करत आहे व त्यासाठी पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी व त्यांचे सहकारी तसेच शास्त्रज्ञ एस. सोमनाथन व त्यांचे इतर सहकारी व समस्त भारतीय अंतराळ शास्त्रज्ञ यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आम्हा सर्वांना त्यांच्याबद्दल अभिमान आहे.

विशेष अभिमानाची गोष्ट म्हणजे ही मोहीम यशस्वी करण्याकरीता आपल्या समाजातील तरुण उद्योजक मिहिर घोटीकर (श्री. सदानंद घोटीकर यांचे सुपुत्र) यांच्याही कंपनीचे महत्त्वाचे योगदान आहे. याचे कारण श्री. मिहिर यांच्या एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि.  यांनी तयार केलेल्या यएच.डी. वर्षा नोझलल या उपक्रमाचा वापर या चांद्रयानात करण्यात आला आहे. कोणतेही यान अंतराळात प्रक्षेपित करतानाच्या प्रक्रियेदरम्यान लॉन्चपॅडवर प्रचंड मोठा म्हणजेच High Disable ध्वनी निर्माण होतो. या ध्वनी लहरींची तीव्रता कमी करण्यासाठी इस्त्रोला योग्य यंत्रणा हवी होती व ते बनवण्याचे अतिकुशल काम एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि.  या कंपनीने केले आहे. पाणी हे ध्वनीलहरी शोषून घेते. वाहत्या पाण्याचा उच्च वेगात मारा केला असता हा ध्वनी नियंत्रित होऊ शकतो. अशा प्रकारचे ठराविक आकाराचे, ठराविक Velocity चे जेट ज्यांच्यामुळे ध्वनिलहरी नियंत्रित होतील व पाणीसुद्धा वाहून जाईल असे नोझल एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि.  ने बनवून दिले आहे व ते अंतराळ यानात नेहमी वापरले जाते. ध्वनि नियंत्रित प्रक्रियेदरम्यान ते पाणी २० सेकंदात वाहून जाणे आवश्यक होते. या नोझल्स् स्प्रे प्रणालित प्रति मिनिटाला २.५ लाख लीटर पाण्याचे फवारे बाहेर पडतात. यामुळे ध्वनी विशिष्ट डेसीबलपेक्षा न वाढता तो नियंत्रित राहतो. एच.डी. वर्षा या ब्रँडचे कंपनीने बनवलेले ८८ नोझल्स् चांद्रयान ३ मध्ये वापरण्यात आले आहेत. चांद्रयान ३ सारख्या भारताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण व महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहीमेच्या लाँच पॅड निर्मितीत मिहीरच्या कंपनीचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

मिहिर एक तरुण उद्योजक असून ६० च्या वर देशामध्ये अग्नी संरक्षण यंत्रणा पुरवण्याचे काम मिहीरची एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि. ही कंपनी गेली अनेक वर्षे करीत आहे.

श्री. मिहीर घोटीकर या तरुण उद्योजकाबद्दल आम्हा सर्व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांना अभिमान आहे. श्री. मिहीर व एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि. यांच्या कंपनीस आमच्या शुभेच्छा व उत्तरोत्तर भारताच्या औद्योगिक व अंतराळ क्षेत्रातील प्रगतीमध्ये एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि. चा वाटा वाढत जावो ही श्री समर्थ चरणी प्रार्थना. तसेच मिहीरचे आईवडील सौ. तनुजा घोटीकर व श्री. सदानंद घोटीकर यांचा अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाबरोबर समवेत असलेल्या सहभागाबद्दल आम्ही सर्व अभिमानी आहोत.

## वाढते सायबर गुन्हे

सायबर गुन्ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून वेगवेगळ्या प्रकारचे लोक त्याला बळी पडत आहेत. बऱ्याच सायबर गुन्ह्यामध्ये मोठी अडचण ही असते की, आपल्याला त्याचा फटका बसला तरी ते कोणाशी शेअर करताना संकोच वाटतो त्यामुळे त्याविषयी तक्रार करणे अनेकदा होत नाही. अशावेळी नेमकं काय करायला हवं ते नीट लक्षातही येत नाही. हाच मुद्दा लक्षात घेऊन ‘रिस्पॉन्सिबल नेटिझम’ या संस्थेने एक हेल्पलाइन (७३५३१०७३५३) सुरू केली आहे. पूर्णपणे विनामूल्य असलेली ही ‘सायबर वेलनेस हेल्पलाइन’ देशातील नागरिकांसाठी सोमवार ते शनिवार सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा या वेळेत उपलब्ध आहे. सायबर सुरक्षा क्षेत्रात ‘रिस्पॉन्सिबल नेटिझम’ गेल्या दहा वर्षापासून कार्यरत असून आत्तापर्यंत लाखो मुलांना– महिलांना सायबर सुरक्षा विषयाचे प्रशिक्षण दिलं आहे. या हेल्पलाइनवर फोन केल्यावर किंवा व्हाट्सअप मेसेज केल्यावर संकटाची परिस्थिती हाताळण्यासाठी काय करायला हवी ते सांगून योग्य ती मदत केली जाणार आहे. काउन्सिलिंगची गरज असेल तर तशी व्यवस्था करण्यात येईल. या क्षेत्रातील तज्ज्ञ, कायदा जाणणारे, मानसशास्त्राचा अभ्यास असणारे आणि योग्य तो मार्ग दाखवणारे ‘सायबर वेलनेस’ तज्ज्ञ यामागे आहेत. ऑनलाईन आर्थिक फसवणूक, सोशल मीडियावर होणारा छळ किंवा ऑनलाईन गेमचा अतिरेक वापर, फेक प्रोफाइल बनवणे, फोटो मार्फिंग, हॅकिंग, ऑनलाइन पाटलाग, खास करून मुलाबरोबर होणाऱ्या सायबर बुलिंग सारखे ऑनलाईन स्वरूपाचे गुन्हे, सायबर विकार आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या वर्तणूकविषयक तसेच मानसिक समस्या अशा सर्व प्रकारासाठी सायबर वेलनेस तज्ज्ञाकडून मदत मिळेल. (महाराष्ट्र टाइम्स यांच्या सौजन्याने)

अधिक माहितीसाठी: रिस्पॉन्सिबलनेटिझम.

ResponsibleNetism CyberWellness Helpline, www. responsiblenetism.org

## भावपूर्ण श्रद्धांजली



अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे कार्यकारी मंडळ सदस्य श्री. वासुदेव पद्माकर चिटणीस यांचे दि. ०२ ऑगस्ट २०२३ रोजी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले आहे. गेली अनेक वर्षे त्यांनी मध्यवर्ती मंडळाचे काम मनःपूर्वक केले आहे. त्यांना समस्त देशस्थ ब्राह्मण मंडळाकडून भावपूर्ण श्रद्धांजली. श्री. वासुदेव चिटणीस हे भारतीय डाक पोस्ट ऑफीस मधून रिटायर्ड झाले होते. मंडळाच्या प्रत्येक कामात त्यांचा सक्रीय सहभाग होता. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी दोन मुले आहेत. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# संलग्न संस्थावृत्त

**मुंबई :** सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात ६०व्या महाराष्ट्र राज्य हौशी संगीत स्पर्धेच्या अंतिम फेरीत 'कट्यार काळजात घुसली' या नाटकासाठी श्री. स्वानंद भुसारी यांना उत्कृष्ट गायन स्पर्धेत रौप्य पदक मिळाले आहे. श्री. स्वानंद भुसारी यांचे मनापासून अभिनंदन.

**सोलापूर :** ❊ लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त अ. भा. ब्राह्मण महासंघाच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी पंचांगकर्ते श्री. मोहनशास्त्री दाते यांचे हस्ते सभासद नोंदणी अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. प्रदेशाध्यक्षा प्रा. मोहिनी ताई पत्की, रामभाऊ व रोहिणी तडवळकर, किरण करकमकर, वेदमूर्ती गोविंद गवई, शहराध्यक्षा सौ. संपदा जोशी, अमृता गोसावी, सौ. मृदुला देवस्थळी, श्री. व सौ. पंतोजि, श्री. बजरंग कुलकर्णी, श्री. काशिकर गुरुजी,पत्रकार अविनाश कुलकर्णी, प्रशांत जाखलेकर,वामन माळगि, सौ. जोशी, सौ. निता मायभटे, संदीप कुलकर्णी, अद्वैत खेडकर, समर्थ पाटील, श्री. येरमाळकर, श्री. कुलकर्णी, देसाई (कर्णिक नगर) आदि मान्यवर उपस्थित होते.

❊ देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूरच्या संस्था सभागृहात अधिक मासानिमित्त आयोजित पुरुषोत्तम यागास प्रारंभ झाला आहे. सात जोडप्यांनी यजमानपद स्वीकारले आहे. यामध्ये संस्थेचे उपाध्यक्ष सौ. व श्री. विजय कुलकर्णी, कोषाध्यक्ष सौ. व श्री. सतीश पाटील, सौ. व श्री. श्रीपाद दीक्षित, सौ. व श्री. भरत काटीकर, सौ. व श्री. अनिल देशपांडे, सौ. व श्री. शरद भट, सौ. व श्री. मोहन मोकाशी यांनी सहभाग घेतला. यावेळी जयंत तुळजापूरकर आणि त्यांच्या सहकारी पौरोहित्य करीत आहेत. त्यांना संस्थेचे कार्यवाह श्याम जोशी सहकार्य करीत आहे. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष दत्ता आराध्ये, वेद प्रतिष्ठानचे गोविंद गवई, रवींद्र तुळजापूरकर, रंगनाथ जोशी युवक शाखा अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, श्रीपाद परळीकर प्रकाश आलाट उपस्थित आहेत.

**भुसावळ : ❊ आवाहन –** मृत्युंजय मासिकाच्या सर्व सभासद बंधु भगीनींना नम्र विनंती की आर्थिक अडचणी मुळे मृत्युंजय मासिकाची छपाई बंद करून आता गेली तीन महिन्यांन पासुन मृत्युंजय मासिक ई मासिक स्वरूपात प्रकाशित करीत आहोत. आपणास नम्र विनंती आहे की आपण आपले आर्थिक सहकार्य करावे जेणे करून मासिक चालविणे शक्य होईल आपले सहकार्य करावे ही विनंती. मृत्युंजय मासिक अर्थिक सहकार्य महाराष्ट्र बॅक चालु खाते क्रमांक ६०१२६४३५२०६ IFSC code ००००१४८, शाखा : भुसावळ, खातेदार नाव : सौ. लक्ष्मी गणेश वढवेकर व ऑनलाईन पेमेंट साठी प्रणव वढवेकर मोबाईल नंबर७०३०३७४०८० या क्रमांकावर करावे. वार्षिक ३०० रुपये पंचवार्षिक १२०० रुपये व दहा वर्षांचाचे २५०० रुपये अर्थिक सहकार्य करावे ही विनंती धन्यवाद!

❊ सर्व सावरकर प्रेमी बंधु – भगीनींना सप्रेम नमस्कार व वंदेमातरम् – सावरकर कार्यातील प्रथम सेवा भावी प्रकल्प स्वा.सावरकर मध्यवर्ती राष्ट्रीय प्रबोधन संस्थेच्या वतीने भुसावळ शहरातील दानशुर व्यक्तीमत्व असलेले श्री. महेशभाऊ फालक व सौ. कल्पना महेश फालक यांनी संस्थेस बक्षीस दिलेल्या ७००० हजार स्क्वेअर फूट जागेवर संस्थेतर्फे वानप्रस्थाश्र (वृद्धाश्रम) गोशाळा, अध्यात्म केंद्र, लघुउद्योग केंद्र व वाचनालय असे पाच सेवाभावी प्रकल्प सुरू केले असून सदर प्रकल्पाला आपण सावरकर भक्त / प्रेमी या नात्याने जरूर भेट द्यावी. सदर कार्यास आपले आर्शीवाद, मार्गदर्शन व यथायोग्य अर्थिक सहकार्य अपेक्षित आहे. सोबत माहिती पत्रक पाठवत आहे. आपल्या सोईने भुसावळला जरूर या. आपले स्वागत आहे.

**※ विलेपार्ले :** आपले कार्यकारणी सदस्य श्री. सदानंद घोटीकर व सौ. तनुजा घोटीकर यांचे सुपुत्र श्री. मिहिर घोटीकर - संचालक, एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि. आणि हर्षद घोटीकर - मालक मे. गोल्ड लीफ डेव्हलपर्स, पुणे या दोन्ही तरुण उद्योजकांनी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ विलेपार्ले येथे विकलांग व अपंग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव दान करण्याचा कार्यक्रम दि. ३० जुलै २०२३ रोजी एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि. यांच्या सहाय्याने तसेच विमल खंडेराव रांगणेकर प्रतिष्ठान, सद्‌गुरु सेवा प्रतिष्ठान व भारत विकास परिषद यांच्या संयुक्त प्रयत्नाने यशस्वीरित्या राबविला होता. विशेषतः नमुद करावेसे वाटते की, चैतन्य आणि सहकारी आणि भारत विकास परिषद विकलांग केंद्राचे विश्वस्त विनय खटावकर हे नियमितपणे विकलांगासाठी हा उपक्रम राबवित आहेत. या उपक्रमाअंतर्गत विकलांग व्यक्तिंच्या हाताची, पायाची मापे घेण्यात येऊन त्यांना त्यांच्या मापाचे कृत्रिम अवयव एका महिन्यात मोफत देण्यात येतात.

कळविण्यास आनंद वाटतो की, या उपक्रमाअंतर्गत ५४ विकलांग किंवा अपंग व्यक्तींना लाभ होणार आहे व त्यांना त्यांचे जगणे सुसह्य होण्यासाठी मोलाची मदत होणार आहे. सौ. विणा भागवत यांनीही या उपक्रमात आपले योगदान दिले आहे. विशेष म्हणजे चैतन्य आणि त्यांचे सहकारी, मिहिर, हर्षद ही तरुण मंडळी जेव्हा अशा प्रकारचा समाजोपयोगी उपक्रम राबवतात. ते बघून असा ठाम विश्वास वाटतो की आपण सर्वांनी हातात घेतलेल्या समाजकार्यात भविष्यातही खंड पडणार नाही व समाजातील गरजू व योग्य व्यक्तींना समाजाकडून अशीच मदत होत राहील. श्री. चैतन्य त्यांचे सहकारी, मिहीर, हर्षद आणि त्यांचे सहकारी या सर्वांचे अभिनंदन व आभार. तसेच एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि. (संचालक, मिहीर घोटीकर), विमल खंडेराव रांगणे प्रतिष्ठान, सद्‌गुरु सेवा प्रतिष्ठान व भारत विकास परिषद या सर्व सेवाभावी समाजोपयोगी संस्थांना शुभेच्छा आणि त्यांचे कार्य जास्तीत जास्त विस्तारीत होऊन समाजातील गरजू अपंग / विकलांग व्यक्तिंना त्यांची सेवा सतत प्राप्त होवो ही समर्थ चरणी प्रार्थना.

त्यांचे हे कार्य बघून मी कार्याध्यक्ष या नात्याने वरील संस्थांना अशा प्रकारचे वेगवेगळ्या शहरांमध्ये उपक्रम घेण्यासाठी विनंती केली आहे. निश्चितच आपल्या सगळ्यांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळेल.

**※ कऱ्हाड :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कऱ्हाड तर्फे विद्यार्थी गुण-गौरव पुरस्कार वितरण समारंभ कार्यक्रम खूप उत्साहात आणि आनंदात दिनांक २२ जुलै २०२३ रोजी 'अक्षयपात्र हॉल', सोमवार पेठ, कऱ्हाड येथे पार पडला. साधारण २०० लोकांची उपस्थिती या कार्यक्रमाला होती. श्री घळसासी गुरुजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी इश- स्तवन केले. सौ कलेढोणकर यांनी आपल्या संघाची



माहिती उपस्थितांना दिली.सौ कित्तूर यांनी ब्राम्हणांनी एकत्र येण्याची गरज या विषयावर मनोगत व्यक्त केले. आपले अध्यक्ष श्री वसंतराव जोशी यांनी संस्कार यावर विचार मांडले. प्रभारी सचिव श्री. नंदकुमार काळे यांनी मनोगत व्यक्त केले.तालुका कार्यकारिणी सदस्य श्री मनोज आचार्य यांनी आपली 'नवीन गोल्ड कार्ड स्कीम' या संदर्भात चांगली माहिती दिली. श्री मयुरेश्वर जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. शहर उपाध्यक्ष श्री नितीन शाळिग्राम यांनी प्रमुख पाहुणे श्री श्रीधर कुलकर्णी यांची ओळख करून दिली. प्रमुख पाहुणे श्री श्रीधर कुलकर्णी यांचे सुंदर भाषण झाले. त्यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण झाले. तालुका अध्यक्ष श्री सुनील पोतनीस यांनी आभार प्रदर्शन केले.आपल्या दुसऱ्या प्रभारी सचिव श्रुती कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री व सौ वसंतराव जोशी, नितीन शाळिग्राम, सुनील पोतनीस, प्रसाद जोशी, मंदार जोशी, मनोज आचार्य, भाऊ भिंगारे, नंदकुमार अष्टेकर, रुपेश दळवी, नंदू काळे, गोविंद घळसासी, अजय उंडाळकर, जयवंत उंडाळकर, धनंजय कुलकर्णी, रमेश कुलकर्णी, गोपीनाथ कुलकर्णी, रघुवीर कुलकर्णी, सौ. कलेढोणकर, श्रुती कुलकर्णी , सौ. कित्तूर, संध्या भिंगारे, सौ. ऋचा काळे, सौ. जाखलेकर, सौ. पोतनीस, ई सर्व सदस्यांनी गेले खूप मेहनत घेतली...त्या सर्वांचे खूप खूप आभार!

**अकोला** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शाखा अकोला तर्फे सर्वशाखीय ब्राह्मण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा २०२३ संपन्न - दि. २३/७/२३ रोजी अकोला येथे रवी.दु ४ वा आर एल टि कॉलेज सायन्स सभागृह येथे संपन्न झाला. इयत्ता ५ वी, ८ वी शिष्यवृत्ती, इयत्ता १०वी व १२वी कला वाणिज्य, विज्ञान शाखा, पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी तसेच कला व क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी या सर्व मिळून जवळपास १४० विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संपन्न झाला, इयत्ता ५वी मध्ये (शिष्यवृत्ती) स्वरनाभ लांडगे हा चिमुकला जिल्ह्यातून ३ आहे, तसेच विविध स्पर्धा परीक्षा जसे होमी भाभा, ऑलिंपियाड गणित व विज्ञान या स्पर्धा परीक्षा मध्ये छोट्या बाळ गोपालांचा सत्कार करण्यात आला इयत्ता १२ वी गुणक्रमांकाने प्रथम स्थानी वाणिज्य शाखेची कु. शिवप्रिया अतुल पाटील हिने ६००/५५८ गुण मिळवले व इतर सर्व विषयात सर्वाधिक गुणांचे पण प्रयोजकांची बक्षीस पटकावले, तसेच अमेय संजय कुलकर्णी याने ६००/५३५ गुण मिळवून दुसरा क्रमांक पटकवला, विज्ञान शाखेचा चि. आदित्य अनिल देशपांडे याने ६००/५२६ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला दुसऱ्या स्थानी कु. मयुरी प्रवीण कुलकर्णी हिने ६००/५१४ गुण मिळवले, इयत्ता १० गुणक्रमांकाने प्रथम कु. मधुरा अभय उपशाम हिने ६००/४८३ गुण मिळवले तर समान गुणांनमुळे कु गार्गी प्रसाद कुळकर्णी ला पण प्रथम क्रमांक देण्यात आला तिला ६००/४८३, गुण मिळाले. विशेष म्हणजे विषयानुसार देण्यात येणाऱ्या परितोषिकात इयत्ता १० मध्ये संस्कृत मध्ये १० विद्यार्थ्यांना १००/१०० गुण हिते तर गणितात ५ विद्यार्थ्यांना १००/१००गुण असे भरगच्च गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे सर्वानी खुप कौतुक केले, पदवी पदवीधर मध्ये विषेश म्हणजे २२पैकी १२ इ ए अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, यावेळी खुप मोठ्या प्रमाणात पालक वर्ग, सर्व ब्राह्मण वर्ग उपस्थित होते.

या सोहळ्याला अध्यक्ष म्हणून माजी कुलगुरू श्री. संजय देशमुख, मुंबई विद्यापीठ, तसेच प्रमुख पाहुणे श्री. प्रभाकरराव कुलकर्णी, कार्याध्यक्ष मध्यवर्ती मंडळ, मध्यवर्ती मंडळाचे विश्वस्त व संपादक श्री. मिलिंद सरदेशमुख याची उपस्थिती होती.

प्रथम उद्‌घाटन सत्राचे संचालन सौ. मंजुषा घोटीकर यांनी केले. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली

सौ. श्रद्धा संत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मंडळाचे अध्यक्ष श्री. महाशब्दे यांनी श्री. संजय देशमुख यांचे पुष्पगुच्छ व शाल श्रीफळ तसेच सन्मान चिन्ह देऊन सत्कार केला, श्री. अनय घोटीकर यांनी श्री. प्रभाकर कुलकर्णी यांचा सत्कार केला व मंडळाचे सदस्य व या सोहळ्याचे संयोजक श्री. संजय देशमुख यांनी श्री. मिलिंदजी सरदेशमुख यांचा सत्कार केला, सदस्य श्री. गणेश मैराळ यांनी श्री. महाशब्दे यांचा सत्कार केला.

यानंतर श्री. महाशब्दे यांनी आपल्या प्रास्ताविकातुन मंडळाच्या वर्षभरातील उपक्रमाविषयी माहिती सांगितली. यानंतर श्री. मिलिंद सरदेशमुख यांनी आपले विचार मांडले अ. भा.मध्यवर्ती मंडळाच्या कार्याची माहिती दिली, तसेच श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी मध्यवर्ती मंडळाच्या विविध उपक्रमाची व शाखेचा विस्तार कसा होईल यावर आपले विचार मांडले, श्री. संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी खुप उपयुक्त असे मार्गदर्शन केले, पालकांचा सहभाग कसा असावा ते पण सांगितले, विद्यार्थ्यांनी आपले क्षेत्र निवडताना काय काळजी घ्यावी त्याचे खुप मोलाचे मार्गदर्शन केले.श्रीमती ज्योती देशमुख यांनी सर्वांचे मंडळातर्फे आभार मानले व दुसऱ्या सत्रात बक्षीस वितरणास सुरवात झाली, याचे सूत्रसंचालन सौ. मृणाल कुलकर्णी यांनी केले, सर्व विद्यार्थ्यांना प्रायोजक रोख रक्कम, मंडळाचे प्रमाणपत्र व भेट वस्तू इ. मान्यवरांच्या हस्ते देऊन कौतुक करण्यात आले, शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. सोहळा यशस्वी करण्यासाठी सचिव श्री. अनय घोटीकर, सौ. मंजुषा घोटीकर, अवंती मैराळ,पल्लवी देशपांडे, श्रध्दा संत, मृणाल कुळकर्णी, मेघा देशमुख ज्योती देशमुख, जयश्री वांगीकर जोती जोशी, तसेच श्री. दिनेश देशपांडे, प्रदीप वांगीकर, गणेश मैराळ, विजयराव देशमुख, संजय देशमुख, जयंत सरदेशपांडे, यांनी परिश्रम घेतले.




*Protect Capital & Create Wealth.....*

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

THE NEW INDIA ASSURANCE CO. LTD.

STAR Health Insurance Personal & Caring The Health Insurance *Specialist*

*Get Insured... & Be Secured....*

# जोडीदार निवडा

**वर पाहिजे........................................................................................................**

● **कु. अपूर्वा मोहन बहिरट.** ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, भ्रमणध्वनी ९८७०७१४७३०, ९८७०७५७००४, पत्ता : कांदिवली, मुंबई, जन्म तारीख/वेळ : ११.०७.१९९३, सकाळी ११.३५, जन्मस्थळ : नाशिक, उंची : ५ फूट, गोत्र : बादरायण, रास : मीन, नक्षत्र : रेवती, चरण : १, गण : देव, नाडी : अंत्य, मंगळ : नाही, वर्ण : गहू वर्ण, बांधा : मध्यम, शिक्षण : B.Com, नोकरी व ठिकाण : मुंबई, हुद्दा (पोस्ट) : Sr. Accountant Executive, अपेक्षा : प्रथमवर, उंची ५ फूट ४ इंच ते ५ फूट ८ इंच. मुंबई पुणेस्थित प्राधान्य, कोणत्याही शाखेचा पदवीधर, स्वतःचे घर असावे, निर्व्यसनी, समंजस, मनमिळावू.

● **कु. संपदा चंद्रकांत केंजळे.** ब्राह्मण पोट शाखा : देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख : २५/६/१९९७ वेळ : दु. २.२८, जन्मस्थळ : पंढरपूर, उंची : ५.२, गोत्र : अगस्ती, रास : कुंभ, नक्षत्र : शततारका, चरण : दुसरे, नाडी : आद्य, गण : राक्षस, रक्तगट : A+, शिक्षण : B.E.Electrical, सध्या सॉफ्टवेअरचा कोर्स करीत आहे. अपेक्षा : मनमिळाऊ, समंजस, नोकरी असावी. संपर्क : चंद्रकांत केंजळे ९६५७०७६०८६/७२७६४६३७३२ बारामती जि. पुणे

● **श्वेता किरण जोशी.** ब्राह्मण शाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : श्रीवत्स, जन्म दिनांक : १६.०८.१९९२, जन्म वेळ : दु. ०१.३०, जन्म स्थळ : कल्याण, उंची : ५.३, नाडी : आद्य, रास : मीन, शिक्षण : रजि. डाएटिशियन, नोकरी / व्यवसाय : चीफ डाएटिशियन, मीरा हॉस्पिटल, कल्याण, रक्तगट : O+, वार्षिक उत्पन्न : ३०,००० मासिक, अपेक्षा : उच्चशिक्षित, निर्व्यसनी, शाकाहारी, गाव / शहर : कल्याण, संपर्क क्र. : ९८१९१०४६७०

● **दिप्ती श्रीकांत देशमुख.** ब्राह्मण शाखा : यजुर्वेदी, गोत्र : सौंघवायन, जन्म दिनांक : २२.०८.१९९२, जन्म वेळ : रा. १०.५७, जन्म स्थळ : कल्याण, उंची : ४.११, नाडी : अंत्य, रास : वृषभ, शिक्षण : Bcom Computer, MSCIT, नोकरी / व्यवसाय : खासगी, अंधेरी, रक्तगट : O+, वार्षिक उत्पन्न : १५,००० मासिक, अपेक्षा : कायम स्वरुपी नोकरीत, निर्व्यसनी, गाव / शहर : कल्याण (प.), संपर्क क्र. : ९८६९६५२४६६ / ७७३८३८६१०४.

● **हिना विलास केतकर.** ब्राह्मण शाखा : कोकणस्थ, गोत्र : गार्ग्ये, जन्म दिनांक : १०.१०.१९९३, जन्म वेळ : दु. १२.५२, जन्म स्थळ : टिटवाळा, उंची : ५.२, नाडी : मध्य, रास : कर्क, शिक्षण : Mcom, नोकरी / व्यवसाय : सह्याद्री सहकारी बँक, मुंबई, रक्तगट : O+, वार्षिक उत्पन्न : १०,००० मासिक, अपेक्षा : सुशिक्षित, निर्व्यसनी, चांगले उत्पन्न, गाव / शहर : टिटवाळा (मांडा), संपर्क क्र. : ९८६७८५३४७४ / ८६५५५६८८८५.

**वधु पाहिजे........................................................................................................**

● **अमोल किशोर कावळे.** जन्मतारीख - ०१.०८.१९९२, जन्म वेळ - सकाळी ५.३०, जन्म ठिकाण - कर्जत, ब्राह्मण शाखा - देशस्थ ऋग्वेदी, गोत्र - भारद्वाज, रास - सिंह, गण - मनुष्य, नक्षत्र - पूर्वा फाल्गुनी, नाडी - मध्य, उंची - ५.८, रक्तगट- O+, शिक्षण - M.Com in Accounts, नोकरी - ठाणे, Business Process Lead, वार्षिक उत्पन्न - ७.५० लाख, अपेक्षा - पदवीधर, नोकरी किंवा व्यवसाय, शाकाहारी, संपर्क - ९८२०८८३३४३/९०२९६६६११०.

● **भूषण प्रदीप खिरवाडकर.** जन्म तारीख - ११.०७.१९८७, जन्म वेळ - सकाळी ७.४५ मिनिटे, जन्मस्थळ - वडोदरा, गुजरात, वैवाहिक स्थिती - घटस्फोटित, नोकरी/शिक्षण - जिओटेकनिकल इंजिनिअर, Roughan & O'Donovan Consulting Engineers, मुळ गाव - वडोदरा, गुजरात, गण - मनुष्य, गोत्र - गौतम, राशी - धनु, नाडी - मध्य, नक्षत्र - पूर्वाषाढा, शिक्षण- बी.इ.सिविल (मा.स.यु.) M.S. Civil Engg. (Swansea University, UK), वार्षिक पगार - ३००००/-, उंची - ५.११, रक्तगट - O+, अपेक्षा - ब्राह्मण, शुद्ध शाकाहारी, ग्रॅज्युएट, नोकरीदार, UK मध्ये असलेले किंवा UK मध्ये पुढील २ वर्षे स्थायी असण्याची तयारी असणारी हवी, संपर्क - ९४२८१६९४०६/९४२९८२९६५४.

● **ओंकार प्रकाश ढवळे.** जन्मतारीख - २४.०६.१९९१, जन्म ठिकाण - ठाणे, ब्राह्मण शाखा - कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र - वशिष्ठ, गण - मनुष्य, उंची - ५.७, वर्ण - गोरा, रक्तगट - AB+, शिक्षण - B.Com, LLB, नोकरी/व्यवसाय - पूर्ण वेळ शेअर मार्केट ट्रेडींग, मासिक उत्पन्न - ३ लाख, अपेक्षा - नोकरी करणारी, सुस्वरुप, मनमिळावू, संपर्क - ९००४६९६९८०.

*With*
*Best*
*Compliments*
*From*



S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565


मयुर कॅटरर्स
दादर, माहिम, माटुंगा येथे लग्न व इतर
कार्यासाठी हॉल पॅकेजसहीत उपलब्ध.
तसेच डेकोरेशन, जेवण, आईस्क्रिम इत्यादी व्यवस्था केली जाईल.
पत्ता : तावडे वाडी, रूम नं. 05, तळमजला, भवानी शंकर रोड, चितळे पथ,
पोर्तुगीज चर्चच्या मागे, वर्तक हॉलच्या बाजुला, दादर(प.), मुंबई-28.
ईमेल : mayurcaterers@gmail.com । www.mayurcaterers.net
फोन : 9322224550 । 9324923020 । 9320291509 । 9821147636
9004200752 । 9320009672 । 022-24306246

Best wishes from

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELAGAVI.

Celebrating 25 Years SILVER JUBILEE 1996-2021

**HEAD OFFICE :**
"Samarth Sadan", Gurukrupa complex,
1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI - 01.
Phone : 0831-2431357, 2403968
e-mail : samarthsociety@yahoo.com
Website : www.samarthsociety.co.in

**R C NAGAR BRANCH :**
"Bhagirathi" R.S. No. 731/D-2,
'C' Scheme, Channamma Nagar,
Main Road, BELAGAVI - 06.
Phone : 0831-2443161

**TILAKWADI BRANCH :**
"Classic Plaza" CTS 44/A2,
Somwarpeth, Tilakwadi,
BELAGAVI - 06.
Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH :**
CTS 1103, 1st Floor,
Bichu Galli, Shahapur,
BELAGAVI - 03.
Phone : 0831-2431257

**KHANAPUR BRANCH :**
1524/A6, Mannerikar Building,
Beside State Bank,
Belagavi-Goa Road, KHANAPUR.
Mob. : 6363090655

## UNIQUE DEPOSIT SCHEME WITH ATTRACTIVE RATE OF INTEREST

### AKSHAY DEPOSIT

| | | | Regular | For Senior Citizen |
|---|---|---|---|---|
| 1) | 46 days to 180 days | ... | 6.00% p.a. | -- |
| 2) | 181 days to 364 days | ... | 6.50 p.a. | -- |
| 3) | 1 Year | ... | 8.00% p.a. | 9.00% p.a. |
| 4) | 2 Years | ... | 9.00% p.a. | 10.00% p.a. |
| 5) | 3 Years | ... | 10.00% p.a. | 11.00% p.a. |

**KALPATARU DEPOSIT : Double in 84 Months**

**GOLD LOAN 12.00% p.a.**

### LOAN SCHEMES

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Personal Security Loan | ... | 16.00% p.a. |
| 2) | Mortgage / Hypothecation / Business / Cash Credit / Govt. Security / Education Loan | | |
| | * Up to Rs. 10 Lakhs | ... | 14.25% p.a. |
| | * Above Rs. 10 Lakhs & upto Rs. 25 Lakhs | ... | 14.50% p.a. |
| | * Above Rs. 25 Lakhs upto Rs. 50 Lakhs & Above | ... | 15.00% p.a. |

### NIRANTAR (Recurring Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 1 Year | 8.00% p.a. |
| 2) | 2 Years | 9.00% p.a. |
| 3) | 3 Years | 10.00 p.a. |

### MADHU SANCHAY (Pigmy Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 6 Months | 3.00% p.a. |
| 2) | 1 Year | 4.00% p.a. |



**Ajay A. Sunalkar**
Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Ganapat A. Kulkarni
Abhay V. Joshi
Sou. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh Sunagar
Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Sou. Chaya N. Joshi
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri



**Suhas R. Kulkarni**
Vice Chairman

Arvind S. Kulkarni (Secretary)

Raghavendra S. Kesnur (Gen. Manager)

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

# दिव्यांग व्यक्तींसाठी कृत्रिम अवयव सहाय्य उपक्रम - विलेपार्ले






Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH